# महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण.मुक्काम पुणे

## मा.म.पोतदार-सदस्य (न्यायीक)

---

पुनरीक्षण अर्ज क्र. TNC/REV/44/2005/KP. निर्णय दि. १८/०१/२०१९.

| | |
|---|---|
| १) श्री कृष्णा रामा बुधाले.<br>२) बाळू गोविंद चव्हाण.<br>रा- तुरंबे, ता. राधानगरी,<br>जि.कोल्हापूर | रिव्हिजन अर्जदार |

विरुध्द

| | |
|---|---|
| १) उपविभागीय अधिकारी राधानगरी कोल्हापूर<br>२) श्रीमती आक्काताई आण्णांसाहेब बुटाले.<br>रा- सौदलगे, ता. चिकोडा, जि.बेळगाव | रिव्हिजन जाबदार |

मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम
कलम ७६ नुसार पुनरीक्षण अर्ज.

रिव्हिजन अर्जदारातर्फे ॲड.भ.बा. भरगुडे.
रिव्हिजन जाबदार १ तर्फे कोणीही नाही.
रिव्हिजन जाबदार २ तर्फे ॲड. सुवर्णा मोरे व ॲड. सौ वृषाली देसाई.

## न्यायनिर्णय

(दि.१८/०१/२०१९)

१) प्रस्तुतचा पुनरीक्षण अर्ज उपविभागीय अधिकारी राधानगरी विभाग कोल्हापूर यांनी टेनन्सी रिव्हीजन अर्ज क्र. ५/१९९९, मध्ये दि- २२/७/१९९९ रोजी मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ मधील कलम ७६-अ नुसार दिलेल्या निर्णयाविरुध्द आहे.

२) उपविभागीय अधिकारी राधानगरी विभाग कोल्हापूर यांनी अप्पर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण राधानगरी यांचा प्रकरण क्रमांक ३२ग- तुरंबे-२६०/८१ मधील दिनांक ०२/०९/१९९८ रोजीचा आदेश रदद केला आहे.

३) रिव्हीजन अर्जदारांच्या वतीने केलेला युक्तीवाद ऐकला, जाबदार नं.२ ने रिव्हीजन अर्जास जे लेखी म्हणणे दाखल केले आहे तोच तिचा युक्तीवाद समजण्यात आला आहे, जाबदार नं.२ ने तोंडी युक्तीवाद केलेला नाही.

Scanned by CamScanner

४) हया प्रकरणात, "उपविभागीय अधिकारी राधानगरी यांनी टेनन्सी रिव्हीजन अर्ज क्रं. ५/१९९९ मध्ये दिनांक २२/७/१९९९ रोजी मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ मधील कलम ७६-अ नुसार अप्पर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण राधानगरी यांचा प्रकरण क्रमांक ३२ग- तुरंबे-२६०/८१ मधील दिनांक २/९/१९९८ रोजीचा निर्णय रदद करण्याचा जो आदेश दिला आहे तो योग्य, कायदेशीर व बरोबर आहे काय ? आणि त्यामध्ये हया न्यायाधिकरणाकडून हस्तक्षेपाची आवश्यकता, गरज आहे काय ? हे मुददे न्यायनिर्णयासाठी उपस्थित होतात.

५) वरील मुदयाचा निष्कर्ष सहजगत्या होण्यासाठी हया प्रकरणातील घटनाक्रम लक्षात घेणे महत्वाचे आहे तो खालीलप्रमाणे.'------

क ) रिव्हीजन अर्जदारांच्या म्हणण्यानुसार मौजे तुरंबे ता-राधानगरी येथील गट नं.१३२/१ क्षेत्र ५ हे. ८८ आर. यापैकी १/२ हिश्याची जमीन हा वादाचा विषय आहे.

ख ) हल्लीचे रिव्हीजन अर्जदार हे दावा मिळकतीचे कुळ आहे असे म्हणतात तर जाबदार नं.२ हे दावा जमिनीची मालक आहे असे म्हणतात.

ग ) दि-२०/१/१९८१ रोजी रामा राऊ बुधाले व बाळू गोविंदा चव्हाण या दोघांनी अप्पर तहसीलदार राधानगरी यांच्याकडे ते वाद जमिनीमध्ये पूर्वीपासून कुळ आहेत, ते ती जमीन खरेदी घेण्यास तयार आहेत तरी ती जमिन खरेदी मिळावी म्हणून अर्ज केला होता.

घ ) अप्पर तहसीलदार यांच्याकडे वरील अर्जाचे काम क्र. ३२ग- तुरंबे-२६०/८१ ने चालले. त्याचा निर्णय दि -११/२/१९८१ रोजी झाला. वाद जमिनीची किंमत ४९३५/- ठरविली गेली.

च ) वरील निर्णयाविरुध्द जमिन मालकीण आक्काताई बुटाले हिने उपविभागीय अधिकारी शाहूवाडी यांच्याकडे अपील नं.१/८२ हे दाखल केले.

छ ) दि-२/५/१९८४ रोजी त्या अपिलाचा निर्णय झाला. उपविभागीय अधिकारी यांनी प्रकरण फेरचौकशीसाठी तहसीलदार यांच्याकडे पाठविले.

ज ) प्रकरण फेरचौकशीसाठी आल्यानंतर अप्पर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण राधानगरी यांनी दिनांक २/९/१९९८ रोजी निर्णय देऊन मौजे तुरंबे ता-राधानगरी येथील चालू गट नं-१४५/१ मधील पूर्वेकडील १/२ जमिन हे.आर.२.९३.९

Scanned by CamScanner

ख. ०.०१ आकार रु.८.१० रामा राऊ बुदाळे व बाळू गोविंदा चव्हाण या कुळांनी रक्कम रुपये ४६४२/- किंमतीस कुळ कायदा कलम ३२ ग अन्वये खरेदी केल्याचे घोषित केले. अप्पर तहसीलदार यांनी त्यांच्या आदेशात असेही नमूद केले आहे की, खरेदीची किंमत कुळांनी यापूर्वीच जमिन मालकांना अदा केली असल्याने कुळांच्या नावे कलम ३२ एम प्रमाणे खरेदी प्रमाणपत्रे देण्यास मंजूरी दिली आहे.

झ) सदर प्रकरणात सुभाष अप्पय्या शिंत्रे याने श्रीमती आक्काताई बुधाले हिचा मुखत्यार म्हणून काम पाहिल्याचे दिसते.

ट) वरील टेनन्सी प्रकरणामध्ये दि-२/९/१९९८ रोजी जो निर्णय झाला होता त्याच्यावर अपिल झालेले नव्हते.

ठ) दि- ६/३/१९९९ रोजी तहसीलदार राधानगरी यांनी उपविभागीय अधिकारी राधानगरी विभाग कोल्हापूर यांना, अप्पर तहसीलदार राधानगरी यांनी प्रकरण क्रमांक ३२ग- तुरंबे-२६०/८१ मध्ये दिनांक २/९/१९९८ रोजी जो आदेश दिला होता तो पुनर्विलोकनासाठी घ्यावा यासाठी लेखी विनंती केली.

ड) तहसीलदार राधानगरी यांनी पुनर्विलोकनासाठी जी कारणे दिली होती त्यामध्ये दावा जमिन मूळ जमिन मालकाकडून शासनाने प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी संपादन करुन प्रकल्पग्रस्तांना वाटप केलेली आहे. दावा जमिनीच्या संपादनाची कार्यवाही पूर्ण होऊन जिल्हाधिकारी व उपसंचालक, प्रकल्प पुनर्वसन (जमीन) कोल्हापूर यांचे नाव दाखल झालेले आहे. जिल्हा पुनर्वसन अधिकारी कोल्हापूर यांच्याकडील दि-२३/५/१९९७ व २९/५/१९९७ च्या आदेशाने प्रकल्पग्रस्तांची नावे दाखल झालेली आहे. दावा जमिनीचे प्रकल्पग्रस्त हे त्यामुळे मानक झालेले आहेत. प्रकरणाच्या चौकशीसाठी त्यांनाही लेखी सूचना देणे आवश्यक होते. त्यांना त्याबददल विचारणा झालेली नाही.

ढ) तहसीलदार राधानगरी यांनी वरीलप्रमाणे लेखी विनंती केल्यानंतर उपविभागीय अधिकारी राधानगरी कोल्हापूर यांनी ते प्रकरण पुनर्विलोकनासाठी टेनन्सी रिव्हीजन अर्ज क्रं.५/१९९९ ने घेतले आणि त्यांनी अप्पर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण यांचा प्रकरण क्रमांक ३२ग- तुरंबे-२६०/८१ मधील दिनांक २/९/१९९८ रोजीचा आदेश रदद केला. त्या आदेशाविरुध्द प्रस्तुतचा रिव्हीजन अर्ज आहे.

ण) उपविभागीय अधिकारी राधानगरी उपविभाग कोल्हापूर यांनी त्यांच्या निर्णयामध्ये,"दावा जमिन ही मूळची आण्णासाहेब ऊर्फ सदाशिव बाबुराव बुटाले यांच्या मालकीची असून त्यांच्या पश्चात वारसा हक्काने आक्काताई आण्णासाहेब बुटाले हया दावा जमिनीचे मालक झाल्याचे दिसून येते. दावा जमिन ही दुधगंगा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात येत असल्याने महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन कायदा १९७६ मधील तरतुदींनुसार दावा जमिन भूमिसंपादन अधिनियम १८९४ अन्वये प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी संपादित करण्यात आलेली आहे. दावा जमिनीच्या संपादनाविरुध्द प्रतिवादी नं. १ व २

Scanned by CamScanner

(म्हणजे रामा राऊ बुदाळे म.वा. कृष्णा रामा बुदाळे व बाळू गोविंदा चव्हाण) यांनी मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका क्रं.४४४/८८ दाखल केलेली होती. सदर याचिकेमध्ये त्यांनी दावा जमिनीमधील कुळपणाचा मुददा उपस्थित केलेला होता. सदरची रिट याचिका दि-२/४/१९९६ रोजीच्या आदेशान्वये फेटाळण्यात आलेली आहे. सदरची रिट याचिका फेटाळल्यानंतर त्यानी पुन्हा दावा जमिनीचे कुळ असल्याचा ठराव होऊन मिळण्यासाठी कुळकायदा कलम ७० (ब) प्रमाणे दि-२१/१२/१९९६ रोजी कुळकायदा अव्वल कारकून राधानगरी यांच्याकडे अर्ज केलेला होता. त्यानुसार पूर्वेकडील १/२ क्षेत्राचे प्रतिवादी नं.१ व २ ( म्हणजे रामा राऊ बुदाळे म.वा. कृष्णा रामा बुदाळे व बाळू गोविंदा चव्हाण ) हे कुळ असल्याचा निर्णय दिलेला आहे. तो निर्णय टेनन्सी अपिल क्रं.१/९९ मध्ये दि-७/५/१९९९ रोजी रदद करण्यात आला आहे असे निरीक्षण नोंदविले आहे.

उपविभागीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये पुढे असेही निरीक्षण नोंदविले आहे की, "कुळकायदा कलम ८८ प्रमाणे कुळकायदयातील तरतुदी सरकारी जमिनीला लागू होत नाहीत. त्यामुळे गट नं.१४५/१ पैकी ३ हे. ८१ आर एवढे क्षेत्र जिल्हाधिकारी व उपसंचालक प्रकल्प पुनर्वसन (जमीन) कोल्हापूर यांचे नावे दाखल असताना सदर जमिनीची कलम ३२ ग अन्वये विक्री करता येणार नाही. भूमिसंपादन अधिनियम १८९४ मधील कलम १६ प्रमाणे संपादित जमिनीचा कब्जा घेतल्यानंतर संपादित जमीन बोजा विरहीत शासनाच्या कब्जात येते. दावा जमिन संपादित करुन महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन कायदा १९७६ मधील तरतुदी नुसार दुधगंगा प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात आलेली असून सदर जमिनीचा त्यांना ताबा देणेत आलेला आहे."

त) तहसीलदार राधानगरी यांच्याकडील संचिका वाचून पाहता त्यामध्ये दि-६/७/१९८६ रोजी तहसीलदार राधानगरी यांच्याकडे श्रीमती आक्काताई बुटाले हिने दिलेल्या अर्जाची प्रत सामील असल्याचे दिसते. त्यातून स्पष्ट होणारी बाब अशी दिसते की, आण्णासाहेब बाबुराव बुटाले म्हणजे तिचा पती दावा जमिनीचा मालक होता. दि-१९/८/१९७७ रोजी त्याची हत्या झाली होती. त्यामुळे तिला गावी राहणे असुरक्षित व भीतीचे वाटू लागल्याने ती तिथून निघून गेली या परिस्थितीचा गैरफायदा घेवून गावातील काही लोक दावा जमिनीला आपल्या नावाची नोंद दाखल करुन घेत आहेत अशी तिची तक्रार होती व सदरची संपूर्ण जमिन धरणग्रस्तांच्या पुर्नवसनासाठी दिलेली आहे असेही तिचे म्हणणे होते.

थ) तहसीलदार राधानगरी यांच्याकडील संचिकेमध्ये ना.उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्रं.४४४/१९८८ मधील दि-२/४/१९९६ च्या आदेशाची प्रत सामील आहे. त्यानुसार बाळू गोविंद चव्हाण,कृष्णा व नारायण रामचंद्र बुदाळे यांच्यासह आणखी दोघेजण असे एकंदर ५ जण पिटीशनर होते व आक्काताई आण्णासाहेब बुटाले ही रिस्पॉंडट नं.५ होती व बाकीचे

Scanned by CamScanner

रिस्पॉडंट हे राज्य शासनाचे अधिकारी होते असे दिसते. ना.उच्च न्यायालयाच्या पान नं.५ वरील निरीक्षणाचा महत्वाचा भाग खालीलप्रमाणे.----

" ****** **Thus, this order Exhibit -E clearly sets aside the certificate under Section 32-M of the Tenancy Act which was issued in favour of the petitioners and clearly posits that the statutory sale in favour of the petitioners has not been materialised. That being the position, the petitioners could have no right even in the land bearing Gat No.132/1 so as to entitle them to contend that the acquisition of that land under the provisions of the Act read with the provisions of the Land Acquisition Act is bad in Law."**

द) ना.उच्च न्यायालयाच्या निरीक्षणामध्ये नोंदविलेली महत्वाची बाब अशी आहे की, भुमिसंपादन कायदयातील कलम ११ ची अधिसूचना ही दि-०२/११/१९७८ रोजी प्रसिध्द झाली होती.

६) पुनरुक्तीचा दोष पत्करुन वरील घटनाक्रमांतून स्पष्टपणाने निष्पन्न होणारी बाब अशी खालीलप्रमाणे मांडता येते की,----

आण्णासाहेब बाबुराव बुटाले हा दावा जमिनीचा मुळ मालक होय. त्याची पत्नी आक्काताई बुटाले म्हणजे या पुनरीक्षण अर्जातील जाबदार नं.२ ही होय. आण्णासाहेब बुटाले याची दि-१९/८/१९७७ रोजी हत्या झाली होती याबददल कोणाचेही दुमत नाही.म्हणजेच दि-१९/८/१९७७ ते त्यापासून पुढे जमीन मालक ही विधवा होती. दि-२/११/१९७८ च्या पुर्वीपासून राज्यशासनाकडून दावा जमिनीसह इतर जमीनींचे प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी संपादन प्रक्रिया सुरु झाली. जमिनीच्या संपादनाची प्रक्रिया ही महसूल विभागाला माहिती नव्हती असे म्हणता येणार नाही. तरीदेखील यातील रिव्हीजन अर्जदार किंवा त्याचे पुर्वहक्कदार हयांनी दावा जमिनीची कुळकायदा कलम ३२ ग प्रमाणे दि-२०/१/१९८१ च्या अर्जाने खरेदी करुन मागितली. मुळातच अर्जाच्या आधीपासूनच दावा जमिन ही शासनाने पुनर्वसनासाठी अधिग्रहित केली असता देखील तत्कालीन अप्पर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण यांनी तो अर्ज मंजूर करुन कुळकायदा कलम ३२ ग प्रमाणे किंमत ठरविली. तत्कालीन अप्पर तहसीलदारांच्या न्यायनिर्णयामध्ये कुळांनी दावा जमीनीतील निम्मा हिस्सा जमीन मालकाच्या स्वाधीन केला होता असे म्हटले आहे परंतु त्या प्रकरणाचा क्रमांक किंवा ती कोणत्या तारखेला जमीन मालकाच्या स्वाधीन केली याचा त्यात उल्लेख नाही.

भूमिसंपादन कायदयाप्रमाणे कोणती व किती जमीन संपादन करावी हे ठरविण्याचा अधिकार सर्वस्वी राज्य शासनास असतो. त्याचप्रमाणे जमीन मालकाला आपली जमीन सर्वच्या सर्व किंवा त्यातील काही भाग किती दयावयाचा किंवा कसे याचा देखील त्याला सर्वस्वी अधिकार असतो. या संदर्भात रिव्हीजन जाबदार आक्काताई बुटाले म्हणजे मूळ जमीन मालकाची पत्नी ही विधवा होती कारण तिच्या पतीची हत्या झाली होती ही बाब दुर्लक्षित करता येत नाही.

Scanned by CamScanner

विशेष बाब अशी की, यातील मुळ रिव्हीजन अर्जदार किंवा त्यांचे पुर्वहक्कदार यांनी संपादनाविरुध्द दाखल केलेली रिट याचिका क्र.४४४/१९८८ ही दिनांक २/४/१९९६ रोजी ना.उच्च न्यायालयाने फेटाळली होती. त्याचप्रमाणे वाद मिळकतीमध्ये त्यांचा कोणताही हक्क पोहचत नाही असे स्पष्ट करुन देखील तत्कालीन अप्पर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण यांनी टेनन्सी केस क्र. ३२ग- तुरंबे-२६०/८१ मध्ये दिनांक २/९/१९९८ रोजी निर्णय देऊन दावा जमिनीची ३२ ग प्रमाणे किंमत ठरविली. सदरच्या ना. उच्च न्यायालयाची माहिती अप्पर तहसीलदार यांना नव्हती असे म्हणता येणार नाही. अशा परिस्थितीत अप्पर तहसिलदार यांनी वाद जमिनीची किंमत कलम ३२ ग प्रमाणे ठरविणे ही गोष्ट ना. उच्च न्यायालयाच्या आदेशास झुगारुन केलेली कृती होय असेच म्हणावे लागते.

आणखी एक विशेष बाब म्हणजे ना.उच्च न्यायालयाचा निर्णय दि-२/४/१९९६ रोजी रिट याचिका क्र.४४४/१९८८ मध्ये निर्णय होऊन देखील कुळकायदा अव्वल कारकून राधानगरी यांनी यातील रिव्हीजन अर्जदार व त्यांचे पुर्वहक्कदार यांनी ते दावा जमिनीचे कूळ आहेत असे ठरवून मागण्यासंबंधीचा कुळकायदा कलम ७० ब नुसारचा अर्ज दि-११/७/१९९७ रोजी मंजूर करुन ते दावा जमीनीचे कुळ आहेत असे घोषीत केले.

थोडक्यात तत्कालीन अप्पर तहसीलदार राधानगरी आणि कुळकायदा अव्वल कारकून राधानगरी या दोघांनीही ना. उच्च न्यायालयाच्या निरीक्षणाविरोधात जाऊन निर्णय दिले आहेत. सहाजिकच ते दोन्ही निर्णय हे बेकायदेशीर आहेत.

दावा जमिनीचे दि- २९/६/१९७९ रोजी रिव्हीजन अर्जदार किंवा त्यांचे पुर्वहक्कदार आणि जाबदार नं.२ आक्काताई बुटाले यांच्यामध्ये साठेखत झाले होते असे म्हटले असले तरी ते साठेखत हे राज्य शासनाने भुमिसंपादन कायदयातील तरतुदींनुसार अधिग्रहित झाले होते त्यानंतरचे आहे त्यामुळे त्या साठेखतास देखील कायदेशीर महत्व उरत नाही किंवा त्या आधारे खरेदी-पत्र करुन मिळावे म्हणून दिवाणी दावा देखील करता येत नाही. साठेखताने वाद मिळकतीवर हक्क सांगणे आणि कुळ म्हणून हक्क सांगणे या दोन गोष्टी भिन्न आहेत. साठेखत विचारात घेऊन त्या आधारे शेतजमीन न्यायाधिकरणास दावा जमीनीची कुळकायदा कलम ३२ ग प्रमाणे किंमत ठरविता येणार नाही.

आणखी एक नमूद करण्यासारखी बाब अशी की, कुळकायदा अव्वल कारकून राधानगरी यांनी टेनन्सी केस क्र. ११/९६ मध्ये दि-११/७/१९९७ रोजी दिलेल्या निर्णयासंबंधी तहसीलदार राधानगरी यांनी दखल घेऊन त्यांना कारणे दाखवा नोटीस काढली होती. यावरुन राज्य शासनाने दावा जमिन विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी संपादित करुनही आणि ना.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.४४४/१९८८ मध्ये त्यातील पिटीशनर बाळू गोविंद चव्हाण, कृष्णा आणि नारायण रामचंद्र बुधाले म्हणजे रामा राऊ बुधाले याचे वारस यांना दावा मिळकतीमध्ये काहीही हक्क पोहचत नाही विशेषत्वाने नमूद करुनही अप्पर तहसीलदार व शेतजमीन

Scanned by CamScanner

न्यायाधिकरण आणि कुळकायदा अव्वल कारकून राधानगरी यांनी रिव्हीजन अर्जदारांच्या लाभामध्ये निर्णय दिले आहेत असे दिसते.

वरीलप्रमाणे परिस्थिती स्पष्ट झाल्यानंतर तहसीलदार राधानगरी यांनी उपविभागीय अधिकारी राधानगरी यांच्याकडे दि-६/३/१९९९ रोजी लेखी विनंती करुन अप्पर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण राधानगरी यांचा प्रकरण क्र. ३२ग- तुरंबे-२६०/८१ मध्ये दिनांक २/९/१९९८ रोजीचा आदेश रदद करण्याची विनंती केली त्यानुसारच उपविभागीय अधिकारी राधानगरी यांनी मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ कलम ७६ अ नुसार प्रकरण पुर्नविलोकनासाठी / पुनरीक्षणासाठी घेऊन अप्पर तहसीलदारांचा तो आदेश रदद केला आहे, तो या पार्श्वभूमीवर योग्य व कायदेशीर आहे असे माझे मत आहे.

७) रिव्हीजन अर्जदारांच्या वकीलांनी उपविभागीय अधिकारी यांनी प्रकरण पुर्नविलोकनासाठी घेत असताना वरीष्ठांची परवानगी घेतली नव्हती तसेच उपविभागीय अधिकारी यांना स्वत:हून ते प्रकरण पुर्नविलोकनासाठी / पुनरीक्षणासाठी घेता येत नाही असा युक्तीवाद केला असला तरी तो मान्य करता येण्यासारखा नाही कारण मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ कलम ७६ अ नुसार मध्ये जिल्हाधिकारी यांना मामलेदाराने किंवा न्यायाधिकरणाने दिलेला निर्णय स्वत:हून पुनरीक्षणासाठी घेता येतो.

८) मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ मधील कलम ७६ अ ही तरतूद खालीलप्रमाणे आहे..---

**जिल्हाधिकाऱ्याचे पुनरीक्षण विषयक अधिकार.**

**[७६- अ. अपील करण्यासाठी दिलेल्या कालावधीत कोणतेही अपील दाखल करण्यात आले नाही तर, जिल्हाधिकारी स्वत: होऊन किंवा विभागीय अधिकाऱ्याने किंवा राज्यशासनाने याबाबत कोणतीही बाब निर्णयासाठी पाठविल्यावर, कोणत्याही वेळी, --**

**क) यथास्थिती, कोणत्याही मामलेदाराने किंवा न्यायाधिकरणाने दिलेल्या कोणत्याही आदेशाचा कायदेशीरपणा किंवा उचितता याविषयी किंवा अशा मामलेदाराचे किंवा न्यायाधिकरणाचे काम नियमानुसार आहे किंवा कसे याविषयी स्वत:ची खात्री करण्याच्या प्रयोजनार्थ, अशा मामलेदाराने किंवा न्यायाधिकरणाने चालविलेल्या कोणत्याही चौकशीचे किंवा कार्यवाहीचे कागदपत्र मागवता येतील;**

**आणि**

**ब) त्यावर त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल:**

**परंतु [अशा आदेशाच्या तारखेपासून एक वर्षाचा अवधी संपल्यानंतर असे कोणतेही कागदपत्र मागविण्यात येणार नाहीत आणि ] हितसंबंध असलेल्या पक्षकारास हजर राहण्याची व आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात आल्याशिवाय,अशा मामलेदाराच्या**

Scanned by CamScanner

**किंवा न्यायाधिकरणाच्या कोणत्याही आदेशात फेरफार करण्यात येणार नाही, तो निर्भावित करण्यात येणार नाही किंवा तो फिरविण्यात येणार नाही.**

म्हणजेच वर नमूद केलेली तरतूद आणि सर्व घटनाक्रम, ना.उच्च न्यायालयाचा रिट याचिका क्रं.४४४/१९८८ यामधील निर्णय आणि राज्य शासनाने दावा जमिन संपादन केल्याची कृती व त्याप्रमाणे विस्थापितांना केलेले जमिनीचे वाटप हे सर्व विचारात घेतले असता उपविभागीय अधिकारी राधानगरी उपविभाग कोल्हापूर यांनी टेनन्सी रिव्हीजन अर्ज क्रं.५/९९ मध्ये दि-२२/७/१९९९ रोजी जो निर्णय दिला आहे तो योग्य व कायदेशीर आहे त्यामध्ये हस्तक्षेपाची आवश्यकता, गरज नाही असे माझे स्पष्ट मत आहे. सहाजिकच प्रस्तुतचा पुनरीक्षण अर्ज हा वर सविस्तरपणे नमूद केल्याप्रमाणे गुणवत्तेवर टिकणारा नसल्याने तो फेटाळण्यास पात्र आहे.

९) प्रस्तुतचा पुनरीक्षण अर्ज मंजूर करणे म्हणजे ना.उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र.४४४/१९८८ च्या निरीक्षणाच्या विरोधात जाणे होईल.

सबब खालीलप्रमाणे आदेश देणेत येतो की,

## आदेश.

१) **प्रस्तुतचा रिव्हिजन अर्ज**/ पुनरीक्षण अर्ज नामंजूर करण्यात आला आहे.

२) **उपविभागीय अधिकारी** राधानगरी विभाग कोल्हापूर यांनी टेनन्सी रिव्हीजन अर्ज क्र. **५/१९९९, मध्ये दि- २२/७/१९९९** रोजी दिलेला निर्णय कायम केला आहे.

Scanned by CamScanner